MHNG100012222023

नि.दि.दा. क्र.६२/२०२३
यशवंत – विरुध्द – कोमल

## निशाणी क्र. १७ आदेश

**अर्ज –**

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी यांनी दि. १४.१२.२०२३ चा ओदश अपास्त होउन मिळण्यासाठी व लेखी खुलासा दाखल करण्यासाठी परवानगी मिळण्यासाठी दाखल केला आहे. प्रतिवादी यांचे थोडक्यात कथन की, प्रतिवादी यांच्यावर समन्सची बजावणी झाली. ते हजर झाले परंतु त्यांनी विहीत मुदतीत खुलासा दाखल केला नाही. त्याचे कारण म्हणजे पुर्वीच्या प्रकरणांबाबत दस्ताऐवज हे जिल्हाधिकारी न्यायालयातुन प्राप्त करावयाचे होते. तसेच, प्रतिवादी क्र. १या दवाखान्यात वैद्यकिय उपचारासाठी भरती होत्या.त्यामुळे ते न्यायालयात येउ शकतले नाही. सबब, खुलासा दाखल करण्यास विलंब जो झाला आहे तो हेतूपूरस्सर नाही. अर्ज खारीज केल्या प्रतिवादी यांचा बचाव, त्यांना दाखल करता येणार नाही. सबब, अर्ज मंजूर करावा अशी विनंती केली.

**खुलासा –**

२. त्यावर वादी यांनी पुरजोरपणे विरोध केला. प्रतिवादी यांना दि. २३.०८.२०२३ रोजी दाव्याचे समन्स प्राप्त झाले आहे. प्रतिवादी यांनी कोणताही अर्ज दाखल केला नाही. म्हणुन दि. १४.१२.२०२३ रोजी न्यायालयाने आदेश पारित केला आहे. प्रतिवादी क्र. २ व ३ यांनी सदरचा अर्ज दिलेला आहे. प्रतिवादी क्र. १ ही प्रतिवादी क्र. २ व ३ ची आई आहे. कसे लांबणीवर टाकण्यासाठी प्रतिवादींचा हेतू आहे . सबब, अर्ज खारीज करावा. वैकल्पेकरुन त्यांनी विनंती केली की, अर्ज मंजूर करावायाचा असल्यास प्रतिवादी यांच्यावर प्रत्येकी रु.५०००/– खर्च बसविण्यात यावा.

३. युक्तीवाद ऐकुन घेउन प्रकरणाचे अवलोकन केले, दावा हा जाहीर घोषित होउन मिळण्याकरिता व कायमच्या मनाई हुकुमाकरिता दाखल दाखल केला आहे. यामध्ये एकुण ४ प्रतिवादी यांना सामिल केलेले आहे. प्रतिवादी यांना दाव्यातील समन्सची बजावणी झालेली दिसते. प्रतिवादी यांना दि. २३.०८.२०२३ रोजी समन्सची बजावणी झाली. प्रतिवादी क्र. १ ते ४ यांची वकीलपत्र दाखल आहे. निशाणी १४ अन्वये प्रतिवादी यांचा अर्ज दाखल आहे. प्रतिवादी यांनी विहीत मुदतीत लेखी कैफियत दाखल केली नाही. म्हणुन न्यायालयाने त्यांच्या विरुध्द दि. १४.१२.२०२३ रोजी विना खुलासा प्रकरण चालविण्यात यावे असा आदेश पारित केला. त्यानंतर प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी यांनी दाखल केला.

४. प्रतिवादी यांनी अर्जात जे नमुद कारण दिले आहेत, त्यामध्ये वैद्यकिय कारण देखील नमुद केले आहेत,परंतु त्याबाबत कोणतेही दस्ताऐवज नाही. प्रतिवादी यांना दाव्यात लेखी कैफियत दाखल करावयाची आहे याची माहिती होती. कारण ते विधिज्ञांमार्फत हजर झाले आहे. अर्जातील कारण सबळ नाही. कारण त्यास दुजोरा देणारा कोणाही दस्त दाखल नाही. परंतु, नैसर्गिक न्यायशास्त्र चे तत्व दुस–याचे म्हणणे ऐकुण घेणे,(audi alterm partem) या अन्वये अर्ज मंजूर करावासा वाटतो. सबब, एकंदरीत विवेचणावरुन मी खालील प्रमाणे आदेश पारित करित आहे.

**आदेश**

१. प्रतिवादी क्र.१ ते ४ यांचा अर्ज रुपये ५००/– च्या शास्तीवर मंजूर करण्यात येतो.

२. सदरची शास्ती प्रतिवादीयांनी वादीस अदा करावी.

सही /–

**( रा.भा. डोळे )**

सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, उमरेड

उमरेड

दिनांक : १५.०६.२०२४

**: <u>प्रमाणपत्र</u> :**

मी प्रमाणित करतो की, सदर पी.डी.एफ. संचिकेच्या मजकुरातील शब्द न शब्द मुळ न्यायनिर्णय / आदेशाप्रमाणे आहे.

लघुलेखकाचे नांव : – आर.एल. जाधव

न्यायालयाचे नांव : – सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर व न्यायदंडाधिकारी प्र. वर्ग, उमरेड.

पी.डी.एफ. अपलोड केल्याचा दिनांक : – ०४–०७–२०२४

स्वाक्षरीत/–

लघुलेखक श्रेणी –३